महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

मुख्य संपादक : रविंद्र घोडविंदे ■ कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १८ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०५७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# केडीएमसीवर कमळ फुलवण्यासाठी भाजपाची जय्यत तयारी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भाजप प्रदेशाध्यक्ष पद स्वीकारल्यापासून डोंबिवलीचे स्थानिक आमदार रवींद्र चव्हाण यांनी स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून कल्याण, डोंबिवलीतील विविध भागातील कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्त्यांना भाजपमध्ये प्रवेश देण्याचा सपाटा लावला आहे. दोन दिवसापूर्वी कल्याणमधील कार्यक्रमात भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी भाजप कार्यकर्त्यांना उद्देशून या शहारांना लागलेले विकासाचे ग्रहण सोडविण्यासाठी, विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कल्याण डोंबिवली पालिकवर भाजपचा महापौर बसविण्याचे आवाहन केले.

तसेच, कल्याण, डोंबिवली परिसर भाजपमय करण्याचे आदेश दिले. प्रदेशाध्यक्षांच्या या हालचालींमुळे आगामी पालिका निवडणुकांवर डोळा ठेऊन भाजपने कल्याण डोंबिवलीची सुभेदारी अर्थात महापौरपद ताब्यात घेण्याच्या व्यूहरचनेची तयारी केली असल्याचे समजते. मागील २५ वर्ष कल्याण डोंबिवली पालिकेत शिवसेना भाजपची सत्ता राहिली. पालिकेवर आपली हुकमत ठेवण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना नगरसेवकांच्या संख्याबळाच्या आधारे बाजी मारली.

राज्यात महायुतीचे सरकार असले तरी मुख्यमंत्री पद भाजपकडे आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण डोंबिवलीचे रहिवासी पान 3 वर ▶▶▶

“ केंद्रात, राज्यात भाजपचे सरकार आहे. त्यामुळे कल्याण डोंबिवली पालिकेत भाजपची सत्ता आली तर या दोन्ही सत्तांच्या माध्यमातून पालिकांमध्ये विविध प्रकारची विकास कामे आणणे, राबविणे शक्य होणार आहे. यासाठी आमचे पालिकेवर वर्चस्व प्रस्थापित करण्याचे प्रयत्न आहेत.

– नंदू परब, जिल्हाध्यक्ष, भाजप कल्याण जिल्हा.

## थोडक्यात महत्वाचे

### ठाण्यात मुसळधार पावसाची हजेरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे शहरात शनिवार सकाळपासून मुसळधार पावसाने -हजेरी लावली आहे. या पावासामुळे अनेक सखल भागात पाणी साचले आहे. शनिवारी सुरु झालेला हा पाऊस रविवारी देखील कायम होता. दुपारी ३.३० वाजेपर्यंत २७.९४ मिमी पाऊस पडल्याची नोंद ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे करण्यात आली आहे.

गेले अनेक दिवस दडी मारुन बसलेल्या पावसाने शनिवारी ठाणे शहरात हजेरी लावली.

भारतीय हवामान खात्याने १५ ऑगस्ट ते २० ऑगस्ट दरम्यान ठाणे जिल्ह्यात पाऊस पडणार असा अंदाज वर्तवला होता. त्यानुसार, १५ ऑगस्ट म्हणजेच शनिवारी सकाळपासून ठाणे शहरात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. शनिवारी सकाळी ११ नंतर पाऊस कमी झाला असला तरी, पावसाची रिपरिप सुरुच होती. परंतु, सायंकाळी ७ नंतर या पावसाने पुन्हा जोर धरला होता. या पावसाने शहरातील अनेक सखल भागात पाणी साचले होते.

### भिवंडीतील बेकायदेशीर बांधकामे सहा महिन्यांत पाडा

■ उच्च न्यायालयाचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** भिवंडीजवळील शेतजमिनीवरील ४६२ बेकायदेशीर बांधकामे फेब्रुवारी २०२६ पूर्वी जमीनदोस्त करा, असे निर्देश उच्च न्यायालयाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) दिले आहेत. ही पाडकामाची कारवाई करताना स्थानिक रहिवाशांकडून अडथळा आणला जाण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने पोलिसांनी एमएमआरडीएला संरक्षण द्यावे, असेही न्यायालयाने कारवाईचा आदेश देताना नमूद केले. त्यामुळे भिवंडीतील बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## माजी नगरसेवक महेश गायकवाड शिंदे गटात ?

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीमुळे खळबळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण - कल्याण पूर्वेतील माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बुधवारी भेट घेतली. या भेटीमुळे आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर महेश गायकवाड शिंदे प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. गायकवाड यांनी या विषयावर थेट स्पष्टीकरण दिले नसले तरी, आपण कल्याण पूर्वेतील विकास कामांच्या विषयावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी सकारात्मक चर्चा केली असल्याचे माध्यमांना सांगितले. येणाऱ्या महापालिका निवडणुकीपूर्वी कल्याण, डोंबिवलीतील शिंदे शिवसेनेची फळी तगडी असली पाहिजे या विचारातून मागील काही महिन्यांपासून कल्याण, डोंबिवलीतील विविध पक्षांमधील पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते पक्षात घेण्याचा सपाटा शिंदे शिवसेनेने लावला आहे. दोन दिवसापूर्वी राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक उमेश बोरगावकर यांना



पक्षात घेऊन शिंदे शिवसेनेने राष्ट्रवादी पक्षाला जोरदार झटका दिला. तसेच, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी येणाऱ्या काळात विकास हवा असेल तर कल्याण डोंबिवली पालिकेवर भाजपचा महापौर बसेल या दृष्टीने कल्याण शहर परिसर भाजपमय करून टाका, असे आवाहन कार्यकर्त्यांना करून त्या दृष्टीने कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पक्ष कार्यकर्त्यांना दिलेल्या इशाऱ्यामुळे शिंदे शिवसेनेत अस्वस्थता पसरली असल्याची चर्चा आहे.

## ७ दिवसांत शपथपत्र द्या, अन्यथा देशाची माफी मागा

### मतचोरीच्या आरोपांवर निवडणूक आयोगाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी मतदार यादीतील गोंधळावर पत्रकार परिषद घेतल्यानंतर निवडणूक आयोगाने शपथपत्र मागितले. यानंतर असं शपथपत्र बंधनकारक आहे का? यावर अनेक दिवसांपासून चर्चा होत आहे. यावर आज (17 ऑगस्ट) निवडणूक आयोगानं पत्रकार परिषदेत उत्तर देत 'शपथपत्र देणं अनिवार्य आहे', असं म्हटलं. ज्यांनी हे आरोप केले आहेत त्यांनी 7 दिवसांच्या आत शपथपत्र द्यावे, अन्यथा माफी मागावी, असं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं. लोकांची दिशाभूल करू नये, जर पुरावा असेल तर तो शपथपत्रासोबत सादर करावा, असं निवडणूक आयुक्तांनी म्हटलं. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी इतर अधिकारीही उपस्थित होते.

## बारवी धरण ओव्हरफ्लो

### ठाणे जिल्ह्याची पाणी चिंता मिटली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : गेल्या काही दिवसांपासून सर्वांचे लक्ष लागलेले बारवी धरण अखेर ओव्हर फ्लो झाले आहे. यंदा पावसाचा जोर पाहता जुलै अखेरीस धरण भरण्याची अपेक्षा होती. मात्र जुलै महिन्यात पावसाचा जोर काहीसा ओसरल्याने यंदा गतवर्षीच्या तुलनेत आठवडाभर उशिराने बारवी धरण भरले आहे. मात्र आता हे धरण पूर्णपणे भरून वाहू लागल्याने ठाणे जिल्ह्याचे पाण्याचे टेन्शन दूर झाले आहे. शनिवारी (दि. १६) दुपारी ३.२५ वा. बारवी धरण पूर्णपणे भरून वाहू लागले असून धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. मागील वर्षी ९ ऑगस्टला म्हणजे आठवडाभर आधीच बारवी धरण पूर्णपणे भरून



वाहू लागले होते. यंदाच्या मे महिन्यात सुरुवातीला बारवी धरण क्षेत्रात झालेल्या पावसामुळे आणि त्यानंतर मे महिन्याच्या अखेरीस अवकाळी आणि पूर्व मोसमी पावसामुळेही धरणातील पाणीसाठा वाढला होता. जून आणि जुलै महिन्यातही समाधानकारक पाऊस झाला. त्यामुळे २५ जून रोजीच बारवी धरण निम्मे भरून धरणात ५०.९५ टक्के पाणीसाठा झाला होता. ५ जुलैपर्यंत हा पाणीसाठा वाढून ६०.६८ टक्क्यांवर पोहचला होता.

धरण भरण्याचा हा वेग पाहता जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कोणत्याही क्षणी बारवी धरण ओव्हरफ्लो होण्याची शक्यता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रशासनाला वाटत होती. त्यानुसार त्यांनी धरण आणि बारवी नदी काठच्या नागरिकांना, स्थानिक प्रशासनाला तसा खबरदारीचा इशाराही दिला होता. मात्र नंतर पावसाचा जोर मंदावला आणि पावसाने उसंतही घेतली. त्यामुळे धरण भरण्याचा वेग मंदावला होता.

बारवी धरणातून अंबरनाथ बदलापूर, उल्हासनगर महापालिका, कल्याण ग्रामीण, मीरा-भाईंदर, ठाणे एमआयडीसी, तळोजा एमआयडीसी या भागांना पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे शासकीय यंत्रणांसह जिल्ह्याचे डोळे बारवी धरण भरण्याकडे लागलेले होते. आता हे धरण पूर्णपणे भरल्याने ठाणे जिल्ह्याचे पाण्याचे टेन्शन दूर झाले आहे.

ठाणे महानगरपालिका



ठाणे महानगरपालिका
पर्यावरणपूरक गणेशोत्सव 2025
आपल्या सहभागाने यशस्वी करूया!

प्रिय गणेश भक्तांनो,
आपला गणेशोत्सव आनंद, श्रद्धा आणि उत्साहाने साजरा होतो. पण आपल्या उत्सवामुळे निसर्गाला हानी होऊ नये, ही सर्वांचीच जबाबदारी आहे. राज्य सरकार व मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशानुसार, ठाणे महानगरपालिका आपल्याला आवाहन करते की पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करूया.

महत्त्वाच्या सूचना

• 6 फूटांपर्यंतच्या गणेश मूर्ती-
6 फूट उंचीपर्यंतच्या सर्व घरगुती व सार्वजनिक मूर्तींचे विसर्जन फक्त कृत्रिम तलावातच करणे बंधनकारक आहे. खाडी किंवा नैसर्गिक तलावात अशा मूर्तींचे विसर्जन करण्यास कायदेशीर बंदी आहे.6 फूटांपेक्षा जास्त उंचीच्या मूर्तींसाठी अन्य पर्याय नसल्यास खाडी किंवा समुद्रामध्ये विसर्जन करता येईल.

• ठाणे महानगरपालिकेची सुविधा-
शहरात ठिकठिकाणी 2 ते 3 फूट उंचीच्या मूर्तींसाठी टँक विसर्जन व्यवस्था करण्यात आली आहे. तसंच 6 फूटांपर्यंतच्या मूर्तींसाठी मोठ्या कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे.

• मूर्ती खरेदी करताना लक्षात ठेवा
POP (प्लास्टर ऑफ पॅरिस) मूर्तींच्या मागील बाजूस लाल रंगाचा गोल चिन्ह असेल. विक्रेत्याकडून विसर्जनाविषयी माहितीपत्रक अवश्य घ्या.

• सार्वजनिक मंडळांसाठी
लहान आकाराच्या मूर्ती बसवण्यासाठी प्रोत्साहन द्या. मोठ्या मूर्तींसोबत विसर्जनासाठी लहान मूर्ती वापरा आणि मोठी मूर्ती पुढील वर्षी पुनर्वापर करा.

• पर्यावरणपूरक सल्ला
मातीच्या/शाडूच्या मूर्तींना प्राधान्य द्या. सजावटीत पर्यावरणपूरक साहित्य वापरा. वीज व पाण्याची बचत करा.

• उल्लंघन केल्यास-
वरील आदेशाचे उल्लंघन केल्यास पर्यावरण संरक्षण व जल प्रदूषण नियंत्रण अधिनियम अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जाईल.

• पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे फायदे
• नद्या, खाड्या व समुद्र स्वच्छ राहतील
• जलीय जीवांचे रक्षण
• निरोगी पर्यावरण पुढील पिढ्यांसाठी
• परंपरेसोबत निसर्ग संवर्धन

सौरभ राव (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक - ठाणे महानगरपालिका

माहितीसाठी संपर्क
ठाणे महानगरपालिका – पर्यावरण विभाग - वेबसाईट: www.thanecity.gov.in

ठाणे बदलतंय... #Thane2.0 | माझी वसुंधरा अभियान ६.० | LiFE Lifestyle for Environment | स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर

*जावक क्रमांक ठामपा/ पिआरओ/जाहिरात/535/2025-2026 - दिनांक : 14 ऑगस्ट 2025

JEEVANDEEP SHAIKSHANIK SANSTHA POI'S
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GOVELI
Tal. Kalyan, Dist- Thane 421103
Permanently Affiliated to University of Mumbai
NAAC Reaccredited "B" Grade

Admission started for Arts, Commerce, Science & Professional Courses

2025-26 ADMISSION OPEN


UNDER GRADUATE
- B.A.: Marathi, English, Economic, History, Sociology, Geography, Political Science
- B.Com: General
- B.Com: Account & Finance
- B.Sc.: Chemistry
- B.Sc.: Maths
- B.Sc.: Information Technology
- B.Sc.: Data Science
- B.A.M.M.C.: Mass Media
- B.M.S.: Management Studies

POST GRADUATE
- M.A.: Marathi, History, Sociology, Economic, Geography
- M.Com.: Advanced Accountancy
- M.Sc.: Chemistry Organic
- M.Sc.: Analytical
- M.Sc.: Information Technology
- M.A. C & J: Mass Media

ज्ञानगंगा घरोघरी

Y.C.M.O.U. COURSES
- M.Sc. (Chemistry)
- M.A. - Yoga
- DCM - Diploma in Co-operative Management
- DCA - Diploma in Computer Applications
- B. lib - Library Science
- MBA - In H. R., Finance, Production, Marketing

SKILL DEVELOPMENT COURSE
- DMLT
- Fire & Safety
- Construction Supervisor
- Photography
- Yoga Teacher Training GDA
- Nursing Course,
- Tally
- Tailoring,
- English Speaking
- Advance Beautician
- Social Media



Incubation & Innovation Center
For more information : 7021995158 I 8108559566
Email - goveli_jssp@rediffmail.com
website :www.jeevandeepcollegegoveli .in

## वाचक मनोगत

# असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड

### अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे निधन



मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय चेहरा, ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीवर एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ज्योती चांदेकर या मराठी रंगभूमीवरील नावाजलेल्या अभिनेत्री होत्या. केवळ रंगभूमीवरच नाही तर चित्रपट आणि दूरचित्रवाहिनीवरील मालिकेतही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. ज्योती चांदेकर यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. लहान असतानाच त्यांनी काही नाटकात अभिनय केला. पुढे अभिनय क्षेत्रातच करियर करायचे असे ठरवून त्यांनी नाटकात भूमिका केल्या. त्यांनी अभिनय केलेले सुंदर मी होणार आणि मिसेस आमदार ही नाटके रंगभूमीवर तुफान गाजली. त्यातील त्यांच्या भूमिका त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरल्या. या भूमिकांनी त्यांना रंगभूमीवर असामान्य अभिनेत्री असा गौरव मिळवून दिला. या नाटकातील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. त्यानंतर त्यांनी चित्रपटाकडे आपला मोर्चा वळवला. ग्यानबाची मेख हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यानंतर त्यांनी तिचा उंबरठा, ढोलकी, सुखांत, मी सिंधुताई सपकाळ, फुलवात, देवा, श्यामची आई या चित्रपटातूनही भूमिका केल्या. ज्योती चांदेकर यांनी रणजीत पंडित यांच्याशी विवाह केल्यावर त्यांना पौर्णिमा व तेजस्विनी या दोन मुली झाल्या. तेजस्विनी ही मराठी चित्रपट सृष्टीतील सध्याची आघाडीची अभिनेत्री आहे. लग्नानंतरही ज्योती चांदेकर यांनी आपले नाव बदलले नाही. ज्योती चांदेकर यांच्या अभिनय कारकिर्दीसाठी त्यांच्या पतीने मोठा त्याग केला. ज्योती चांदेकर यांची अभिनय कारकिर्द सुरू रहावी यासाठी त्यांच्या पतीने आपली नोकरी सोडली आणि मुलींचा सांभाळ करण्याचा निर्णय घेतला. ज्योती चांदेकर यांच्या कारकिर्दीत अनेक चढ उतार निर्माण झाले पण त्या डगमगल्या नाहीत. आलेल्या संकटावर त्यांनी मात केली आपली अभिनय कारकिर्द यशस्वी केली. चित्रपट आणि नाटकासोबतच त्यांनी टीव्हीवरील मालिकेतही भूमिका केल्या. त्यांनी साकारलेली 'ठरलं तर मग' मालिकेतील पूर्णा आजी, मी सिंधुताई सपकाळ या चित्रपटातील सिंधुताई सपकाळ या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. देवा एक अतरंगी या चित्रपटामधील त्यांची भूमिका देखील प्रेक्षकांना भावली. ज्योती चांदेकर यांनी असंख्य नाटकं आणि मालिका यांच्या माध्यमातून आपल्या अभिनयकलेचा अविस्मरणीय ठसा उमटवला. ठरलं तर मग आता या मालिकेत त्यांनी साकारलेली पूर्णा आजी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. या भूमिकेने त्यांना घराघरात पोहचवले. ज्योती चांदेकर या संपूर्ण महाराष्ट्राची लाडकी पूर्णा आजी बनल्या. याच मालिकेत अभिनय करत असताना त्या आजारी पडल्या आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. पडद्यावरील त्यांची सहजसुंदर अभिव्यक्ती, आत्मीय भाव आणि प्रांजळ संवादकळा प्रेक्षकांच्या मनात कायम राहतील. त्यांच्या जाण्याने एक प्रेमळ आई, जिव्हाळ्याची कलाकार, असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड गेली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

**श्याम ठाणेदार, दौंड**

# कबुतरखाने बंद करण्यास विरोध का ?



## आरोग्यावर कबुतरांचा काय परिणाम होतो?

### उच्च न्यायालयाने काय म्हटलं आहे?

मुंबई उच्च न्यायालयात कबुतरखान्यांवरील कारवाई आणि त्यांचं खाद्य बंद करू नये याबाबत याचिका दाखल करण्यात आली होती. 30 जुलै रोजी यावर सुनावणी पार पडली. तर 7 ऑगस्ट रोजी पुन्हा सुनावणी होणार आहे. कबुतरांचा आरोग्यावर परिणाम होतो असा कुठलाही पुरावा किंवा ठोस डेटा सरकारने उपलब्ध केला नसल्याचा दावा याचिकाकर्त्या स्नेहा विसारिया यांनी केला आहे. त्यांनी सांगितलं की, "कबुतरांमुळे आरोग्यवर परिणाम होतो असं सांगतायत पण त्याचा कुठलाही पुरावा सरकारकडे नाहीये. आम्ही आतापर्यंत 20 आरटीआय दाखल केल्या पण याबबात माहिती मिळू शकलेली नाही." "कबुतरखान्यांच्या ठिकाणी बोर्ड लिहिले आहेत की 60-65 टक्के हायपरसेंसीटीव्हिटी न्यूमोनायटीस यामुळे होतो पण असा कुठलाही पुरावा नाही किंवा स्टडी प्रेझेंट केलेला नाही. अशा केसेसमध्ये कबुतर एक कारण असलं तरी प्रदूषण, स्मोकींग ही मुख्य कारणे आहेत. कारण असं असतं तर आतापर्यंत अनेकांना एचपी हा आजाराने त्रस्त असते," असं विसारिया यांनी सांगितले.

मुंबई महानगरपालिकेकडून दादर येथील कबुतरखाना याठिकाणी एक नोटीस बोर्ड लावण्यात आला आहे. यात म्हटलंय की, 'सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की सदर ठिकाणी पशु पक्ष्यांना खाद्य टाकण्यास सक्त मनाई आहे. सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी पक्ष्यांना उघड्यावर दाणे टाकल्याने बुरशीचा संसर्ग होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांना श्वसनाचे आजार उद्भवू शकतात. मुंबई महानगरपालिका स्वच्छता आणि आरोग्य उपविधी 7.5 अंतर्गत पशु-पक्ष्यांना खाद्य टाकणे हा गुन्हा आहे. वरील प्रत्येक गुन्ह्याकरता 500 रुपये दंड आकारण्यात येईल.'

प्राणीशास्त्राच्या प्राध्यापक असलेल्या आमदार मनिषा कायंदे यांनीही माहिती दिली की, "कबुतरांचे मायक्रो फेदर्स हे डोळ्यांना दिसत नाहीत. ते नाकातून शरीरात प्रवेश करू शकतात. यामुळे हायपरसेंसीटीव्ह नीमोनीयाटीस होऊ शकतो. कोणालाही आजार होऊ शकतो. आपल्याला कशामुळे श्वसनाचा त्रास होतो हे लोकांना कळतच नाही."

दरम्यान, याबाबत नानावटी रुग्णालयातील छातीतज्ज्ञ (चेस्ट स्पेशलिस्ट) डॉ. सलील बेंद्रे यांनी बीबीसी मराठीशी बोलताना सांगितलं, "कबुतरांची विष्ठा किंवा पीसं (फेदर डस्ट) ते श्वासाद्वारे फुफ्फुसात गेल्यानंतर बरेच दिवस हे सुरू राहिलं तर फुफ्फुसात फायब्रॉसिसची प्रक्रिया सुरू होते. फुफ्फुसाचे काही भाग असतात त्यात त्याची लवचिकता कमी होते. यामुळे रुग्णाला सुका खोकला येणं, चालल्यावर धाप लागणं, जीने चढल्यावर दम लागणं ही लक्षणं दिसतात.

"लंग फॉयब्रॉसिस हा कबुतरांमुळे होणारं कारण कॉमन आहे. यामुळे यापासून दूर राहणं किंवा टाळणं हाच उपाय आहे. कारण एकदा फायब्रॉसिस प्रक्रिया सुरू झाली की आपण मागे नाही जाऊ शकत. हळूहळू तो वाढत जातो," असं डॉ. बेंद्रे म्हणतात. कबुतरांना खाद्य देणं टाळायला हवं. निवासी परिसरात याचं एक्सपोजर नसेल तरच हा आजार नियंत्रणात राहील, असंही त्यांनी सांगितलं. या आजाराची लक्षणे सांगताना ते म्हणाले, सुरुवातीली सुका खोकला यायला सुरुवात होते. मग चालताना दम लागणे किंवा धाप लागणे ही लक्षणं दिसतात.



2 ऑगस्ट रोजी महानगरपालिकेने दादर येथील कबुतरखाना बंद केला. यासाठी संपूर्ण कबुतरखान्याला ताडपत्रीने झाकण्यात आलं. यावेळी स्थानिकांनी आक्षेप घेतल्याची दृश्य देखील समोर आली. तसंच दक्षिण मुंबईत पक्षीप्रेमी आणि जैन समाजाकडून 3 ऑगस्ट रोजी विरोध प्रदर्शन करण्यात आलं. यात जैनमुनी सुद्धा सहभागी झाले होते, यावेळी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली की, "आतापर्यंत पूर्ण समाज झोपलेला आहे. मुंबई महानगरपालिकेचा निर्णय चुकीचा आहे. हा आमच्या धर्माच्या विरोधात आहे. सात तारखेला मुंबई उच्च न्यायालयातून काय येतो ते पाहणार. आज आम्ही कबुतरांसाठी परमात्माकडे प्रार्थना करत आहोत.

### कबुतरखाने बंद करण्याची मागणी का ?

पावसाळी अधिवेशनादरम्यान जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विधानपरिषदेत शिवसेनेच्या (शिंदे गट) आमदार मनिषा कायंदे यांनी मुंबईतील कबुतर खाने आणि कबुतरांमुळे मानवी आरोग्यावर परिणाम होत असल्याचा मुद्दा मांडला. त्या म्हणाल्या, "लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर प्रश्न अनेक शहरांमध्ये तयार होत आहे. अनधिकृत कबुतरखाने ठिकठिकाणी वाढत चालले आहेत. काही ठिकाणी काढले आहेत. पण काही लोकांना असं वाटतं की कबुतरांना दाने घातले पाहिजे. तर कुठेही एखाद्या फुटपाथवर देखील काही लोक येतात कबुतारखाना चालू करतात. "दादर येथील कबूतरखाना वाहतूक बेट हे पुरातन यादी जतन श्रेणी 2 मध्ये येत असला तरी तिकडे कबूतर खाना तयार झाला आहे अनेक वर्षांपासून तिकडच्या स्थानिक लोकांना श्वसनाचा त्रास होतोय," असं कायंदे म्हणाल्या.

# मुरबाड शहर मनसेच्या दहीहंडीत बाल गोपाळांचा थरांचा जल्लोष!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड-प्रतिनिधी**

मुंबई, ठाण्यासह संपुर्ण महाराष्ट्रात दहीहंडी उत्सवाचा जल्लोष आणी थरार पाहायला मिळाला असून" गोविंदा रे गोपाळाच्या" जयघोषाने व डिजेच्या आवाजाने शहरे दुमदुमून निघालि होति. मुरबाड शहरातील प्रतिष्ठित असलेल्या मनसे शहर प्रमुख देवेंद्र जाधव यांनी मुरबाड नगरपंचायत कार्यालया समोर आयोजित केलेल्या दहीहंडीला बाल गोपाळांनि मोठ्या संख्येने गर्दी केलेलि पाहायला मिळाली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना मुरबाड शहर आयोजित ''मनसे दहीहंडी २०२५" मोठया जल्लोषात साजरा करण्यात आला. या दहीहंडला मुरबाड विधानसभेचे कार्यसम्राट आमदार किसन कथोरे यांनी उपस्थित राहून गोपाळांना शुभेच्छा दिल्या. तसेच मनसे जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांच्यासह शहरातील व तालुक्यातील अनेक राजकिय व सामाजिक क्षेत्रातिल मान्यवर, अनेक पत्रकार बंधूनी आपली उपस्थीती दर्शविली तसेच मुरबाड तालुक्यातुन असंख्य पथकांनी सलामी दिली. यावर्षीचा दहीहंडी फोडण्याचा मान शास्त्रीनगर येथिल गोविंदा पथकाला मिळाला असून 33333/ रोख रक्कम व ट्राफी त्यांनी जिंकली.या दहीहंडीचे आयोजक मनसे शहराध्यक्ष देवेंद्र जाधव,उपशहराध्यक्ष कु. नरेश माळी,तालुका सचिव रुपेश खाटेघरे,शहरसंघटक कीर्ती गोहिल व इतर मनसे सैनिकांनी मेहनत घेऊन दहीहंडी उत्सव कोणतेही गालबोट न लागता मोठया उत्साहात साजरा झाल्या बद्दल सर्वांचे आभार मानले आहेत. तर या कार्यक्रमाचे सदाबहार व उत्कृष्ट सुत्रसंचालन प्रसिद्ध शिव व्याख्यात्या हभप सौ.करूणाताई गगे यांनी करून कार्यक्रमात रंगत आणली.



# नाना टिळक प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** पेण एज्युकेशन सोसायटीच्या वावोशी येथील नाना टिळक प्राथमिक विद्यालयातील गरीब गरजू मुलांना खालापूर पोलिसांच्या माध्यमातून स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून गणवेश वाटप करण्यात आले.

यावेळी वावोशी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील पोलीस हवालदार श्री. चौधरी यांच्या हस्ते मुलांना गणवेश वाटप देण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या धनाजी घरत, वावोशी गावचे माजी तंटामुक्ती अध्यक्ष गोविंद वालम, ग्रामपंचायत सदस्य मयूर धारवे सदस्या रिया वालम पोलीस पाटील मनीष पाटील , दांडवाडी शाळेचे मुख्याध्यापक श्री. पालांडे सर आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत शाल व पुष्पगुच्छ देऊन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ विद्या घरत यांनी केले. सूत्रसंचालन मानसी केदारे तर आभार सुनील पवार यांनी केले.

# रॅलीद्वारे जोंधळे महाविद्यालयाचा सामाजिक बांधिलकीचा संदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी** :-शहापूर तालुक्यातील जोंधळे एज्युकेशनल इन्स्टिट्यूट आसनगाव येथे स्वातंत्र्य दिनाचा उत्सव देशभक्तीच्या आणि सामाजिक जाणीवेच्या वातावरणात पार पडला. ध्वजारोहन प्राचार्या डॉ. पूर्णिमा एकनाथ सर्वे यांच्या हस्ते पार पडला. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष वर्षा जोंधळे, उपाध्यक्ष गीता खरे , सचिव डॉ. स्नेहा जोंधळे तसेच संचालक प्रितम देशमुख आणि हर्ष जोंधळे उपस्थित होते.शहापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुकेश धगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. स्वातंत्र्य दिनानिमित्त पोक्सो कायदा, महिलांची सुरक्षा, सायबर गुन्हे प्रतिबंध आणि मानवी तस्करीविरोधात जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली. महाविद्यालयापासून शाहापूर न्यायालयापर्यंत काढण्यात आलेल्या या रॅलीत विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

रॅलीदरम्यान "महिलांची सुरक्षा – आपली जबाबदारी", "सायबर गुन्हे थांबवा – जागरूकता वाढवा" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.यावेळी प्राचार्या सर्वे म्हणाल्या कि जोंधळे इन्स्टिट्यूट ऑफ लॉ अँड रिसर्च हे केवळ कायद्याचे शिक्षण देणारे केंद्र नाही, तर विद्यार्थ्यांना संवेदनशील, जबाबदार आणि समाजाशी जोडणारे व्यासपीठ आहे. आम्ही विद्यार्थ्यांमध्ये कायदेशीर साक्षरता आणि सामाजिक जाणीव रुजवणारे उपक्रम राबवू शकतो.

# क्रांती दौडच्या माध्यमातून तिरंग्याच्या साक्षीने देशभक्तीचा प्रवास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : वेदांत कॉलेज, विठ्ठलवाडी येथील विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित केलेली "क्रांती दौड" १५ ऑगस्ट रोजी देशभक्तीच्या उत्साहात आणि घोषणांच्या गजरात यशस्वीरीत्या पार पडली. सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक प्रतापगड किल्ल्यापासून १३ ऑगस्ट रोजी प्रारंभ झालेली ही तीन दिवसीय पायदळ यात्रा, ग्रामीण भागातून प्रवास करत १५ ऑगस्टच्या सकाळी वेदांत कॉलेजच्या प्रांगणात पोहोचली.

समारंभासाठी मंडळ अधिकारी राजेंद्र बोराडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी धावपटूंना प्रोत्साहित केले तसेच सर्व धावपटूंचा सत्कार करून त्यांचा गौरव केला.

# ओतूरचे पोपट नलावडे यांचा सेलिब्रेटींसोबत सेल्फीचा वर्ल्ड रेकॉर्ड



दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**जुन्नर:** ओतूर गावच्या पोपट नलावडे या तरुणाने आपल्या अनोख्या आवडीला चिकाटी, मेहनत आणि सातत्याची जोड देत एक आगळावेगळा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. वर्ल्ड रेकॉर्ड्स इंडिया या संस्थेमार्फत "जास्तीत जास्त महाराष्ट्रीयन सेलिब्रेटींसोबत सेल्फी" घेण्याचा नवा विक्रम नलावडे यांच्या नावे अधिकृतरीत्या नोंदवला गेला आहे.

नलावडे यांनी गेल्या दोन वर्षांत चित्रपटसृष्टीतील अनेक नामांकित अभिनेते-अभिनेत्री, आंतरराष्ट्रीय स्तरावर कीर्ती मिळवलेले खेळाडू, पद्मश्री व पद्मविभूषण पुरस्कारांनी गौरवलेली मान्यवर व्यक्तिमत्त्वे, तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील दिग्गज अशा तब्बल २५० पेक्षा जास्त महाराष्ट्रीयन सेलिब्रेटींसोबत सेल्फी काढल्या आहेत. त्यांच्या या धडपडीमुळे एक वेगळ्या प्रकारचा विक्रम घडून आला आहे. या विक्रमाच्या निमित्ताने ८ ऑगस्ट रोजी देहू येथील संत तुकाराम महाराज संस्थान येथे भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी वर्ल्ड रेकॉर्ड्स इंडियाचे CEO पवन सोळंकी व संस्थेचे विश्वस्त ह.भ.प. माणिक महाराज मोरे यांच्या हस्ते नलावडे यांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि मेडल प्रदान करून गौरवण्यात आले.

या यशानंतर नलावडे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "हा विक्रम हा फक्त माझ्यासाठी नाही तर माझ्या ओतूर गावासाठी आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे. मला भेटलेल्या प्रत्येक सेलिब्रेटीने दिलेला सहकार्याचा आणि प्रेमाचा हात हा माझ्या प्रवासातील खरी ताकद ठरली. हा प्रवास इथं थांबणार नाही, अजून नवनवीन विक्रम करण्याची माझी इच्छा आहे."

नलावडे यांच्या या यशाने ओतूर व परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार, तसेच गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहात त्यांचे अभिनंदन केले

# आमदार किसन कथोरेंच्या हस्ते डॉ. वृषाली घुडे यांच्या फिजिओथेरपी सेंटरचे उद्घाटन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड शहरात नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. प्रथमच शहरात अत्याधुनिक, सुसज्ज व अद्ययावत सुविधा असलेले फिजिओथेरपी सेंटर सुरु करण्यात आले असून, याचे उद्घाटन मुरबाड विधानसभेचे आमदार मा. किसनराव कथोरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

या केंद्राच्या माध्यमातून शहर व तालुक्यातील नागरिकांना सुदृढ, निरोगी आणि उत्तम आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे. या संदर्भात बोलताना डॉ. वृषाली आकाश घुडे (कंटे) यांनी सांगितले की, "मुरबाड तालुक्यातील रुग्णांना कमीत कमी दरात उच्च दर्जाची व दर्जेदार उपचारसेवा देण्याचा आमचा प्रयत्न असेल."

या केंद्रामध्ये मणक्याचे विकार, मानेचे दुखणे, पाठदुखी, सांधेदुखी अशा विविध समस्यांवर थेरपीच्या माध्यमातून उपचार करण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे येथे उपचारासाठी आधुनिक व नवे तंत्रज्ञानयुक्त मशीनरी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णांना ग्रामीण भागात असूनही शहरासमान आधुनिक आरोग्यसेवेचा लाभ घेता येणार आहे.

उद्घाटन सोहळ्याला मुरबाड तालुक्यातील अनेक राजकीय, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहिले. त्यांनी डॉ. घुडे यांच्या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले व या केंद्राच्या माध्यमातून अधिकाधिक रुग्णांना दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

डॉ. वृषाली आकाश घुडे यांच्या प्रयत्नामुळे मुरबाड तालुक्यातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेची नवी दारे खुली झाली असून, हा उपक्रम स्थानिकांसाठी एक मोठा दिलासा ठरणार आहे.

# घोडबंदर मार्गावर आज रात्रीपासून २३ दिवसांसाठी वाहतुक बदल लागू


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** घोडबंदर मार्ग हा वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. परंतु या मार्गावर ठाणे पोलिसांनी आज रात्रीपासून पुढील २३ दिवसांसाठी मोठे वाहतुक बदल लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. कापूरबावडी परिसरातील मुख्य मार्गावरील वाहतुक पूर्णतः बंद केली जाणार आहे. येथील मेट्रोच्या कामामुळे हे वाहतुक बदल लागू केले जाणार आहे. त्यामुळे मध्यरात्री आणि पहाटे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या चालकांना कोंडीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

**- हे वाहतुक बदल १७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या कालावधीत दररोज रात्री ११ ते पहाटे ५ या कालावधीत लागू असतील. अत्यावश्यक वाहनांना हे वाहतुक बदल लागू नसतील असे पोलिसांनी स्पष्ट केले**

### कसे आहेत वाहतुक बदल?

- मुंबई, ठाणे शहरातून माजिवडा पूलावरून घोडबंदरच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या सर्व वाहनांना ज्युपिटर वाय जंक्शन येथे प्रवेशबंदी असेल. येथील वाहने उड्डाणपूलाखालील मार्गाने कापूरबावडी चौक, नंदीबाबा, ढोकाळी मार्गे वाहतुक करतील, किंवा पोखरण रोड क्रमांक दोन येथून वाहतुक करण्यास नागरिकांना परवानगी असेल.



**सोमवार १८ ऑगस्ट २०२५**

**मेष**
व्यवसायानिमित्त प्रवास करावा लागेल. आज तुमचा दिवस संमिश्र जाणार आहे. संकोच करु नका.

**वृषभ**
पालकांचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल. तुमच्या मुलाच्या यशाने तुम्ही आनंदी व्हाल.

**मिथुन**
आज व्यवसायात अपेक्षेपेक्षा जास्त फायदा होणार आहे . दिवस खूपच आनंदाचा जाणार आहे.

**कर्क**
कार्यालयात अधिकारी तुमच्या कामावर खुश राहतील. तुमच्या आवडीच्या लोकांच्या भेटी होतील.

**सिंह**
प्रॉपर्टीशी संबंधित लोकांना फायदा होईल. आज अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**कन्या**
आज तुम्हाला ऑफिसमध्ये एक नवीन प्रोजेक्ट मिळेल, जो तुम्ही पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल.

**तूळ**
तुम्ही गंभीर बाबी शांततेने आणि संवादाने सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. थोडे भावूकही होऊ शकता.

**वृश्चिक**
घाईघाईने कोणताही निर्णय न घेणे चांगले. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. प्रसन्नता जाणवेल.

**धनु**
मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे.

**मकर**
कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. तुम्हाला तुमच्या कामाच्या ठिकाणी लक्षणीय दैदिप्यमान यश मिळेल.

**कुम्भ**
दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. या राशीच्या अभियंत्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे.

**मीन**
योग्य दिशेने कठोर परिश्रम केल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये यश मिळेल. थकवा जाणवेल.

### १८ ऑगस्ट दिनविशेष

- १७०० : मराठा साम्राज्याचे पेशवे थोरले बाजीराव पेशवे ऊर्फ श्रीमंत बल्लाळ बाळाजी भट यांचा जन्म.
- १९३४ : गीतकार, कवी, लेखक दिग्दर्शक गुलजार यांचा जन्म.
- १९५६ : भारतीय फलंदाज संदीप पाटील यांचा जन्म.
- १९४५ : भारतीय क्रांतिकारक, आझाद हिंद सेनाचे संस्थापक नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे निधन.
- १९७९ : वसंतराव नाईक यांचे निधन.








# नालासोपाऱ्यात इमारतीचा सज्जा कोसळला

## सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** मागील दोन दिवसापासून शहरात अतिवृष्टी सुरू आहे. या अतिवृष्टीमुळे नालासोपारा येथील प्रगतीनगर परिसरात एका जीर्ण इमारतीचा सज्जा कोसळल्याची घटना घडली आहे. शनिवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. हा सज्जा थेट खाली असलेल्या रिक्षावर कोसळल्याने रिक्षाचे मोठे नुकसान झाले आहे. नालासोपारा पूर्वेच्या भागात अमन अपार्टमेंट इमारत आहे. या इमारतीत अनेक कुटुंब राहतात. ही इमारत जुनी झाली असून काही भाग जीर्ण झालेल्या अवस्थेत आहे.

शहरात मागील दोन दिवसापासून सतत अतिवृष्टी सुरू त्यामुळे शनिवारी रात्री अचानकपणे या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरचा सज्जा कोसळून खाली उभ्या केलेल्या रिक्षावर कोसळला त्यामुळे यात रिक्षा चेंगरून गेली आहे. या घडलेल्या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

यापूर्वी नालासोपारा पूर्वेच्या अलकापुरी साई राज अपार्टमेंट पंधरा वर्षे जुनी असलेली इमारत भर पावसात कोसळली होती. या इमारतीचा धक्का बाजूला असलेल्या कुसूम अपार्टमेंट व नरेंद्र माऊली या इमारतींना ही बसला. त्या इमारती सुद्धा पालिकेकडून जमीनदोस्त करण्यात आल्या होत्या. सातत्याने अशा घटना समोर येत असल्याने जीर्ण झालेल्या व धोकादायक अवस्थेत असलेल्या इमारतींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# पनवेल मनपाच्या शास्ती माफी योजनेला मुदतवाढ द्या!

### भाजप आ. प्रशांत ठाकूर यांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** - पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता करावरील शास्ती माफी योजनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेला असला तरी, अजूनही अनेक नागरिकांना या योजनेचा लाभ घेता आलेला नाही. त्यामुळे शास्ती माफीची मुदत आणखी ३० दिवसांनी वाढवावी, अशी मागणी भाजपचे आ. प्रशांत ठाकूर यांनी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. आतापर्यंत ७० हजार करदात्यांनी अभय योजना जाहीर झाल्यापासून २१० कोटी रुपये एका महिन्यात पनवेल महापालिकेच्या तिजोरीत जमा केले आहेत.

# सुवर्णलक्ष राष्ट्रीय क्रीडा पुरस्काराने डॉ. श्रीकांत रणखांबे यांचा सन्मान




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मेजर ध्यानचंद केंद्रीय क्रीडा परिषद, भारत आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिन नुकताच राजारामबापू नाट्यगृह, इस्लामपूर, जिल्हा सांगली येथे माजी आमदार भगवानराव साळुंखे, महाराष्ट्र केसरी (1978) आप्पासाहेब कदम , ऑलम्पिकवीर बंडा पाटील रेटरेकर , पोलिस अधिकारी गणेश कोंडते या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाला. यावेळी मांजर्डे, गावचे सुपुत्र, थोर समाज सेवक, कुस्तीचे आधारस्तंभ डॉ. श्रीकांत सीताराम रणखांबे यांना त्यांच्या कुस्ती खेळातील भरीव योगदानाबद्दल महाराष्ट्र केसरी आप्पासाहेब कदम यांच्या हस्ते सुवर्णलक्ष राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार 2025 देऊन गौरवण्यात आले.

क्रीडा क्षेत्राला एक नवी दिशा देणारे, राष्ट्रीय कुस्ती संघटक डॉ. श्रीकांत सीताराम रणखांबे, यांचे कुस्ती या खेळात योगदान अतुलनीय आहे. त्यांनी अनेक कुस्ती मैदानांचे सातत्याने आयोजन करून अनेक कुस्ती मैदानांना आधार देऊन सहकार्य केले आहे, त्यांचे कुस्ती खेळ वाढवण्यासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे मोलाचे महान कार्य केले आहे. क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या उदात्त कामगिरीमुळे महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. देश भरातून नामवंत मल्लांना गावच्या कुस्ती आखाड्यात सातत्याने ते आणत आहेत. मल्लांच्या स्नेह भोजनाची सोय ते करीत आहेत.

अनेक वर्षांपासून प्रथम क्रमांकाचे ते बक्षीस लावत आहेत. अनेक मल्लांच्यावर ऑपरेशनचे मोफत उपचार करून त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. शिक्षण, वैद्यकीय , सामाजिक क्रीडा आदी अनेक क्षेत्रात त्यांचे भरीव योगदान आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वांना आनंद झाला असून राणाप्रताप क्रीडा व्यायाम संस्था, दिनकरदादा युवाशक्ती, आर. आर. पाटील एज्युकेशन ट्रस्ट, राजे उमाजी नाईक मंडळ, नवतरुण बौद्ध विकास मंडळ, बौद्ध विकास मंडळ मुंबई, कवी कट्टा ग्रुप कल्याण मुंबई, रमाबाई महिला मंडळ, बौद्ध साहित्य परिषद महाराष्ट्र राज्य सह जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात अभिनंदनाचा त्यांच्यावर वर्षाव होत आहे .यावेळी देशभरातून क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. अध्यक्ष विठ्ठल कालेल, सुभाष भंडारे आदीसह मेजर ध्यानचंद केंद्रीय क्रीडा परिषद, भारत यांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केला.

# संत ज्ञानेश्वर जयंतीनिमित्त ठाण्यात दिंडी सोहळा



### ठाणे महापालिका आणि संत ज्ञानदेव सेवा मंडळ यांचा संयुक्त उपक्रम

### आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, माजी खासदार राजन विचारे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी झाले दिंडीत सहभागी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : संत ज्ञानेश्वर यांच्या ७५०व्या जयंतीनिमित्ताने ठाणे शहरात दिंडी काढण्यात आली. ठाणे महापालिका आणि संत ज्ञानदेव सेवा मंडळ यांनी संयुक्तपणे केलेल्या या उपक्रमात ठाणेकर नागरिक, वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

संत ज्ञानेश्वर मंदिर पाचपाखाडी येथून सुरू झालेल्या या दिंडीमध्ये आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, माजी खासदार राजन विचारे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, माहिती जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, संत ज्ञानदेव सेवा मंडळाचे अजित मराठे, माजी उपमहापौर ॲड. सुभाष काळे, अभय मराठे, मधुकर घोलप, अशोक घोलप यांच्यासह वारकरी मंडळी सहभागी झाली. ज्ञानोबा-तुकारामचा गजर करीत संत ज्ञानेश्वर मंदिर, महापालिका मुख्यालय, कलावती मंदिर येथून ही दिंडी धर्मवीर आनंद दिघे मार्गावरून पुन्हा संत ज्ञानेश्वर मंदिराकडे आली. महापालिका मुख्यालयासमोर वारकरी मंडळींनी रिंगण केले आणि जयघोष केला. त्यानंतर, मंदिरापाशी दिंडीचे विसर्जन होऊन संत ज्ञानेश्वर महाराजांची आरती, भजन करून या सोहळ्याची सांगता झाली.



### निर्धोक कर्तव्य बजावण्यासाठी

# अंबरनाथ नगरपरिषद सफाई कर्मचाऱ्यांना मिळाली पावसाळी सुरक्षा साधने

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : अंबरनाथ नगरपरिषदेतर्फे मा. मुख्याधिकारी यांच्या आदेशान्वये स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येला नगरपरिषदेच्या सफाई कामगार व शिपाई यांना उपमुख्याधिकारी यांच्या हस्ते पावसाळी साधनांचे वाटप करण्यात आले.

या वेळी सफाई कामगार व शिपाई यांना गणवेश, रेनकोट, गमबूट तसेच चामडी काळे बूट देण्यात आले. पावसाळ्यात नागरिकांना स्वच्छतेच्या सुविधा पुरविताना कामगारांना सुरक्षितता व सोय व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कर्तव्य बजावण्यासाठी अत्यावश्यक साहित्य उपलब्ध झाल्याने कर्मचाऱ्यांनी नगरपरिषद प्रशासनाचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमास नगरपरिषदेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे कामगारांचे मनोबल वाढून ते अधिक उत्साहाने कर्तव्य बजावतील, असा विश्वास मा. उपमुख्याधिकारी यांनी व्यक्त केला.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कोकण विभागाची आढावा बैठक संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** चालू वर्षात होणाऱ्या जिल्हा परिषद, नगरपंचायत आणि महापालिका सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वसमावेशक आढावा बैठक 'राज्य निवडणूक आयोग'च्या वतीने 'आयोग'चे आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागात पार पडली. कोकण भवनमधील समिती सभागृहात दोन सत्रांमध्ये सदर बैठक घेण्यात आली. या बैठकीत आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वतयारीतील प्रत्येक टप्प्याचा आढावा घेण्यात आला. मतदार यादी अद्यावत करणे, मतदान केंद्रांचे नियोजन, कर्मचारी आणि सुरक्षा व्यवस्था, तसेच मतदार जनजागृतीसाठीच्या उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस 'राज्य निवडणूक आयोग'चे सचिव सुरेश काकाणी, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, 'राज्य निवडणूक आयोग'चे विशेष कार्यकारी अधिकारी अं. गो. जाधव, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल, वसई-विरार महापालिका आयुक्त एम. एम. सूर्यवंशी, मीरा-भाईंदर महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा, उल्हासनगर महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे, भिवंडी-निजामपूर महापालिका आयुक्त अनमोल सागर, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ (ठाणे), किशन जावळे (रायगड), इंदूराणी जाखड (पालघर), एम. देवेंदर सिंह (रत्नागिरी), अनिल पाटील (सिंधुदुर्ग) तसेच निवडणुकीशी संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोकण विभागांतर्गत येणाऱ्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ७ जिल्ह्यांमध्ये एकूण ७५ विधानसभा मतदारसंघ आहेत. ७ जिल्ह्यांमधील महसूल गावांची एकूण संख्या ६५३० असून या गावांमधील लोकसंख्या २ कोटी ८६ लाख १ हजार ४७१ आहे. बैठकीदरम्यान राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सर्व महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले की, निवडणुकीची तयारी सुक्ष्म नियोजनानुसार पूर्ण व्हावी. कोणत्याही प्रकारचे अडथळे, तांत्रिक अडचणी किंवा मनुष्यबळाची कमतरता वेळेवर दूर करण्यात यावी. दरम्यान, या आढावा बैठकीमुळे कोकण विभागातील निवडणुकीच्या तयारीस वेग मिळाला असून, मतदारांचा विश्वास दृढ करण्यासाठी आणि पारदर्शक निवडणूक पार पाडण्यासाठी सदर टप्पा महत्त्वाचा ठरणार आहे.

# वसई विरारमधील बेवारस वाहनांचे भिजत घोंगडे 'जैसे थे'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** वसई विरार शहरातील विविध ठिकाणच्या रस्त्यावर व कडेला अजूनही बेवारस अवस्थेत वाहने पडून असल्याचे चित्र दिसून येत आहे. ही वाहने हटविण्यात आली नसल्याने राहदारीला अडथळे ठरत आहेत. अशा बेवारस वाहनांचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा अशी मागणी पुढे येत आहे.

वसई विरार शहरात वर्षानुवर्षे रस्त्यावर उभ्या असलेल्या बेवारस वाहने व भंगार साहित्य यामुळे शहराचे विद्रुपीकरण होऊ लागले आहे. त्यासोबत शहरातील वाहतुकीस अडथळा तयार होऊन वाहने चालविण्यास अडचणी निर्माण होत आहेत. शहरात आधीच रस्ते अरुंद व वाहनांची संख्या अधिक आहे. त्यातच बेवारस व भंगारात गेलेली वाहने रस्त्याच्या कडेला उभी करून रस्ते गिळंकृत होऊ लागले आहेत. वर्षानुवर्षे वर्षे ही वाहने एका जागीच उभी राहत असल्याने समस्या निर्माण होत असतात. अशा वाहनांमुळे वाहतुकीला अडथला निर्माण होत असतो. याशिवाय रस्त्यावरून नागरिकांना ये जा करणेही अडचणीचे ठरते. तर दुसरीकडे या वाहनांचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी वाहने ही तशीच पडून असल्याने अशा वाहनांत आजूबाजूच्या भागातील लहान मुले ही खेळण्यास जात असतात त्यामुळेही एखादी दुर्घटना होण्याची शक्यता असते. तर काही वेळा गर्दुल्ले ही अशा बेवारस वाहनांचा वापर गैरप्रकारासाठी करण्याची शक्यता आहे.

**विरार, नालासोपारा, वसई अशा सर्वच भागात बेवारस वाहने उभी असल्याचे दिसून येतात असे प्रवाशांनी सांगितले आहे. शहरातील रस्त्यांची स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ही वाहने व भंगार साहित्य रस्त्यावर पडून राहिल्याने योग्य रित्या स्वच्छता करता येत नाही. मध्यंतरी महापालिका व वाहतूक पोलीस यांच्या तर्फे बेवारस वाहने हटविण्याची मोहीम हाती घेतली होती. आता ती मोहीम थंडावली असल्याने बेवारस वाहने तशीच पडून राहिली आहेत असे नागरिकांनी सांगितले आहे.**

### संत ज्ञानेश्वरांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त

# कल्याण डोंबिवली महापालिका शिक्षण विभागाचा पालखी सोहळा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्षमहोत्सवी (७५०) जयंती वर्षानिमित्त काल स्वातंत्र्यदिनी सायंकाळी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे शिक्षण विभागातर्फे ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीचे सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.या सोहळ्यात कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील, गजानन विद्यालय, बालक मंदिर शाळा, रवींद्र माधव ओक हायस्कूल तसेच जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे हायस्कूल व ज्युनियर कॉलेज या शाळांमधील सुमारे १०० हून अधिक विद्यार्थी व शिक्षकांनी तसेच शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी उत्साहाने सहभाग घेतला.या मिरवणुकी दरम्यान विद्यार्थ्यांनी संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांची घोषवाक्ये देत नागरिकांना समाजात एकता, शांतता व सद्भावना टिकविण्याचा संदेश दिला. ज्ञानेश्वर माऊलीच्या विद्यार्थी वर्गाने काढलेल्या या पालखी सोहळ्यातील विद्यार्थ्यांची पारंपारिक वेशभूषा, पारंपरिक वाद्य व आकर्षक सजावट नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती.हा पालखी सोहळा महापालिका मुख्यालयातून शहरातील प्रमुख मार्गावरून शंकरराव चौक ते गांधी चौक ते अहिल्याबाई चौक ते गजानन विद्यालय पर्यंत काढण्यात आला असून, मोठ्या संख्येने नागरिकांनी त्यांस उत्स्फूर्त प्रतिसाद देत संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराजांच्या कार्याचे ,मौलिक विचारांचे स्मरण केले.

# शालार्थ प्रणालीत कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मुदतवाढ द्या - अनिल बोरनारे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई (प्रतिनिधी) शालार्थ आयडी प्राप्त अनुदानित व अंशतः अनुदानित कर्मचाऱ्यांचे कागदपत्र अपलोड करण्याकरिता 30 सप्टेंबर मुदतवाढ देण्याची मागणी भाजपाचे प्रदेश कार्यकारणी निमंत्रित सदस्य व मुंबई मुख्याध्यापक संघटना उत्तर विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी केली आहे

याबाबत बोरनारे यांनी राज्याचे शिक्षण संचालक यांच्याकडे लेखी निवेदन पाठवून ही मागणी केली आहे

शालार्थ आयडी प्राप्त अनुदानित व अंशतः अनुदानित कर्मचाऱ्यांचे कागदपत्रे अपलोड करण्याकरिता शासनाने 30 ऑगस्ट 2025 तारीख दिली होती. परंतु सदर कार्यवाहीसाठी अनेक तांत्रिक अडचणी येत आहेत

शालार्थ प्रणालीमध्ये खाजगी अनुदानित/अंशतः अनुदानित शाळेतील सर्व कार्यरत शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांचे यांची दि.18/11/2012 ते दि. 07/07/2025 या कालावधीत शालार्थ आयडी प्राप्त कर्मचारी यांचे नियुक्ती आदेश, रूजू अहवाल, वैयक्तिक मान्यता व शालार्थ मान्यता आदेश अपलोड करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत सदर अपलोड केलेली कागदपत्रे स्पष्ट / वाचनीय आवश्यक आहेत. त्यानुसार सदरची कार्यवाही आहरण व संवितरण अधिकारी तथा प्राचार्य / मुख्याध्यापक (डि. डि. ओ.1) यांचे स्तरावरून अनिवार्य आहे. सदरची कार्यवाही पूर्ण न केल्यास माहे. ऑगस्ट 2025 चे वेतन देयक स्विकारले जाणार नाही यांची नोंद घ्यावी असे संदर्भिय आदेश दिले आहे.

तथापि शिक्षणाधिकारी हे ज्यावेळी वैयक्तिक मान्यता व शालार्थ आय डी दिल्यानंतर एक प्रत वेतन पथक यांना पाठवित असतात सर्व कागदपत्रे 'त्यांचेकडेच असून आपण कागदपत्रांची मागणी करणे हे संयुक्तीक नाही. सदरील कामकाजासाठी वेळ लागत असून मूळ कागदपत्रे हे संस्थेकडे असतात ते गोळा करणे आणि कामकाज करणे यात वेळ लागू शकतो त्यासाठी शिक्षकांचे ऑगस्ट महिन्याचे वेतन रोखून धरणे चुकीचे असून या कामासाठी 30 सप्टेंबर पर्यंत हा मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी अनिल बोरनारे यांनी केली आहे

# केडीएमसीवर कमळ फुलवण्यासाठी भाजपाची जय्यत तयारी

पान 1 वरुन ▶▶▶ आहेत. या संधीचा फायदा घेत महायुतीमधील पक्षांना न दुखावता भाजपच्या कल्याण, डोंबिवलीतील पदाधिकाऱ्यांनी शहराच्या विविध भागातील इतर पक्षांमधील कार्यकर्ते, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांना भाजपमध्ये घेण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

भाजपची संघटनात्मक ताकद वाढविण्याचे प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांचे भाजपच्या स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना आदेश आहेत. प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली यावेळी पालिका निवडणुकांमध्ये भाजपचा वरचष्मा राहील यादृष्टीने भाजपचे कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी पक्ष, कार्यकर्ते वाढीसाठी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. आगामी पालिका निवडणुकीचा विचार करून कल्याण, डोंबिवलीत भाजप कार्यकर्ते कल्याणच्या सुभेदारीसाठी कामाला लागले आहेत, असे चित्र आहे.

कल्याण पूर्वेत भाजप आमदार सुलभा गायकवाड, कल्याण पश्चिमेत माजी केंद्रीय राज्यमंत्री कपील पाटील आणि डोंबिवलीत स्वता प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, २७ गावमध्ये जिल्हाध्यक्ष नंदू परब अशा विभागणीतून डोंबिवली, कल्याण, टिटवाळा, २७ गाव या विभागवार पध्दतीने भाजपची संघटनात्मक ताकद वाढविण्याचे काम भाजपने सुरू केले आहे.

ही कामे करताना राज्य सत्तेमधील मित्र दुखवणार नाहीत याचीही काळजी घेतली जात आहे. भाजपसमोर आव्हान उभे करण्याच्या अन्य पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या प्रभागात भाजपकडून कार्यक्रम लावले जात आहेत.

# कल्याण शीळ रस्त्यावरील खड्डयामुळे तरुणाने गमावला जीव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण शीळ रस्त्यातील खड्डयामुळे झालेल्या अपघातात कल्याणातील एका तरूणाला जीव गमवावा लागला आहे. रोहन शिंगरे असे या तरुणाचे नांव आसून तो रामबाग येथे राहत होता. 23जुलै रोजी नेहमी प्रमाणे कामावर जाण्यासाठी बाईकने निघला असता, खड्यात त्याची बाईक जोराने आदळली. त्यामुळे रोहनचा तोल गेला आणि रस्त्यावर पडला त्याचवेळी त्याच्या मागून भरघाव येणाऱ्या ट्रकच्या चाकाखाली त्याचा हात गेल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याल उपाचार्थ खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. उपाचारादरम्यान त्यांचा एक हात काढवा लागला, दरम्यान त्याची प्रकुती सुधारत असताना अचानक बिघडली आणि उपचारदरम्यान 15 ऑगस्ट रोजी दुर्दैवी मृत्यु झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुख:चा डोंगर कोसळला आहे.



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे ■ सोमवार ■ १८ ऑगस्ट २०२५

jeevandeepvartanews2020@gmail.com



# चार दिवसात तीन पोलिसांच्या आत्महत्या - वाढत्या आत्महत्यांमुळे चिंता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई- मुंबईत पोलिसांच्या आत्महत्यांचे सत्र सुरूच असून मागील ४ दिवसात तीन पोलिसांनी आत्महत्या केली आहे. त्यापैकी तिन्ही आत्महत्यांचे कारण स्पष्ट झालेले नाही. पोलिसांच्या वाढत्या आत्महत्यांमुळे चिंता व्यक्त होत आहे. शनिवार सशस्त्र पोलीस दलातील एका कर्मचाऱ्याने आत्महत्या केली.

मुकेश देव (४५) हे मरोळच्या सशस्त्र पोलीस दलात पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होते. ते अंधेरी पूर्वेच्या आगरकर बस आगाराजवळ असलेल्या पोलीस वसाहतीत रहात होते. शनिवारी सर्वत्र दहिहंडीचा उत्सव सुरू होता. देव आपल्या घरात एकटेच होते. संध्याकाळी ४ च्या सुमारास त्यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. शेजाऱ्यांनी पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला माहिती दिली. देव यांना पुढील उपचारासाठी जुहूच्या कुपर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले. या प्रकरणी अंधेरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून सहाय्यक पोलीस निरीक्षक जौंजाळ पुढील तपास करत आहेत.

पोलिसांनी आत्महत्या करण्याची ही ४ दिवसातील तिसरी घटना आहे. बुधवारी १३ ऑगस्ट रोजी कांदिवलीच्या समता नगर पोलीस ठाण्यातील गणेश राऊळ (३२) या पोलिसाने नालासोपारा रेल्वे स्थानकात ट्रेनखाली उडी घेऊन आत्महत्या केली. सुरवातीला त्यांचा मृत्यू रुळ ओलांडताना झाला असे वाटले होते. मात्र नंतर सीसीटीव्ही तपासले असता त्यांनी आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले.



# जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांचा मुरबाडमध्ये पाहणी दौरा!

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**मुरबाड-प्रतिनिधी :: दिलीप पवार**

ठाणे जिल्हयाचे नवनिर्वाचित डॅशिंग,धडाकेबाज जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी अचानक मुरबाड तालुक्यामध्ये पाहणी द्वौरा केला आहे.विशेषतः आज रविवारी सुट्टी असताना देखील त्यांचा पाहणी दौरा चर्चेत राहिला आहे.पहिल्यांदाच त्यांनी मुरबाड तालुक्याला सदिच्छा भेट दिली असून मुरबाड तहसिलदार कार्यालयालाही त्यांनी भेट दिली.यावेळी त्यांचे मुरबाडचे तहसिलदार अभिजीत देशमुख यांनी सहर्ष स्वागत केले.यानंतर ठाणे जिल्हाधिकारी श्री.पांचाळ यांनी सर्व विभागासह व्यायाम विभागाची पाहणी केली.तालुक्यातील आदिवासी बांधवांनी आपल्या हस्तकलेने घडवलेलं,निसर्गाशी जोडलेलं आदिवासी बांबू बहु उपयोगी वस्तु ठाणे जिल्हाधिकारी श्री.पांचाळ यांना मुरबाड तहसिलदार श्री.देशमुख यांनी भेट देऊन या कार्यालयाच्या कामकाजाची माहिती दिली.यावेळी नायब तहसिलदार अमोल शिंदे यांच्यासह अधिकारी,तलाठी, मंडळाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.यानंतर मुरबाड तालुक्याच्या भौगौलिक व नैसर्गिक पर्यटन असलेल्या माळशेज घाटाकडे ठाणे जिल्हाधिकारी यांनी प्रस्थान केले.तेथील असलेल्या आदिवासी वाडी वस्तीतील माहिती घेत जिल्हाधिकारी यांनी माहिती ही जाणून घेतली.जिल्हाधिकारी श्री.पांचाळ यांनी आत्ताच काही दिवसांपूर्वी ठाणे जिल्हाधिकारी म्हणून पदभार स्विकारले असून त्यांनी ग्रामीण भागाकडे विशेष लक्ष देऊन विविध असलेल्या नागरिकांच्या समस्या जाणून घेत ते दूर करण्यासाठी दुरदृष्टी नजर असल्याचे या पाहणीद्वौरातून दिसते. विशेष म्हणजे त्यांनी सुट्टीच्या दिवशीही केलेल्या पाहणी द्वौरातून सर्व नागरिकांनी त्यांच्या प्रशंसेचे कौतुक केले आहे.

# पडघ्यात शिवसेना उबाठा गटाच्या दहीहंडी उत्सवाला प्रतिसाद

## उंच थर लाऊन कल्याणच्या महिला गोविंदा पथकाने वेधले सर्वाचेच लक्ष



● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

पडघा दि. १७ (प्रतिनिधी)

राजकीय दृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील शिवसेना उबाठा गटाच्या मानाच्या दहीहंडी उत्सवाला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिवसेना (उबाठा) पडघा शहर व विभागाच्या वतीने उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर व शहरप्रमुख संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मानाच्या दहीहंडी उत्सवाचे आयोजन शनिवारी बस स्थानक परिसरात करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना (उबाठा) सचिव विनायक राऊत, उपनेत्या ज्योतीताई ठाकरे, जिल्हाप्रमुख केदार दिघे, कुंदन पाटील, मनोज गगे, संपर्क प्रमुख सोन्या पाटील माजी आमदार रूपेश म्हात्रे ज्योतीताई ठाकरे, भिवंडी ग्रामीण विधानसभा संपर्क संघटक हनुमान पाटील, मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी महीला आघाडी तालुका अध्यक्ष फशीताई पाटील उपतालुकाप्रमुख रघुनाथ पाटील अँड. शशीकांत गोतारणे कृषी बाजार समितीचे उपसभापती मनेष म्हात्रे सरपंच रविंद्र विशे उपसरपंच नयना जाधव उद्योजक, पंडीत पाटील राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष गणेश गुळवी माजी सरपंच पराग पाटोळे, अंनता पाटील उपविभागप्रमुख भास्कर माळी, संजय पटेल, रूपेश कुडुसकर अशोक गायकवाड ,महेश राऊत, रवि भोईर, प्रदीप भोईर, विजय भोईर, भगवान सांबरे, दिपेश वांळज उपस्थित होते. तालुक्यातील 21 गोवींदा पथकांना शाल सन्मान चिन्ह व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले तर यावेळी युवा राष्ट्र महीला गोंविदा पथक कल्याण यांनी या ठिकाणी उंच थर लाऊन सर्वाचेंच लक्ष वेधुन घेतले होते शिवसेना (उबाठा) गटाची मानाची दहीहंडी ओम साई प्रतिष्ठान पडघा या गोवींदा पथकाने फोडली त्यांना मानाची शाल, पुष्पगुच्छ आकर्षक चषक, रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

# बारावे गावात कचराकुंडीजवळ आढळले जिवंत अर्भक

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील बारावे गाव हद्दीतील शिवमंदिर परिसरात कचराकुंडी जवळ एक स्त्री जातीचे दोन दिवसांचे जीवंत अर्भक आढळून आले. खडकपाडा पोलीस ठाण्यातून माहिती मिळाल्यानंतर रुक्मिणीबाई रुग्णालयातील प्रशासनाने हे अर्भक ताब्यात घेतले आहे. या बालकाची प्रकृती स्थिर आहे. हे बालक बालरोग तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात येईल, असे कल्याण डोंबिवली पालिकेच्या रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. समीर सरवणकर यांनी माध्यमांना सांगितले. या बालकाचे वजन दोन किलोग्रॅम आहे. बारावे परिसरातील एका सोसायटीतील दाम्पत्याकडून हे बालक याठिकाणी आणून ठेवले असावे असा संशय पोलिसांना आहे. यापूर्वी असे प्रकार वाढले होते. परंतु, अलीकडे शहराच्या विविध भागात पालिकेकडून स्मार्ट सिटी प्रकल्पातून सीसीटीव्ही कॅमेरे शहराच्या विविध भागात बसविले आहेत. त्यामुळे नको असलेले नवजात बालक रस्त्याच्या कोपऱ्याला, कचराकुंडी किंवा झाडाखाली गुपचूप आणून ठेवले तर याप्रकरणी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरूध्द गुन्हा दाखल केला जातो. हा गुन्हा करणारी व्यक्ती तपास करताना सापडली तर त्याच्यावर गुन्ह्याचा दोषारोप पोलिसांकडून ठेवण्यात येतो

# आसनगाव येथे वित्तीय समावेशन शिबिरांचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.17 :-** भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभाग व भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) यांच्या निर्देशानुसार, ठाणे जिल्ह्यात प्रत्येक ग्राम पंचायत स्तरावर १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत विशेष आर्थिक साक्षरता मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेचा उद्देश सामान्य नागरिकांमध्ये विशेषतः ग्रामीण भागातील, महिला, वृद्ध नागरिक, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक यांच्यात वित्तीय जागरूकता निर्माण करणे आहे. यामध्ये खात्याची ReKYC करने, डिजिटल आर्थिक साक्षरता, जबाबदारीने कर्ज घेणे, फसवणूक टाळण्यासाठी जागरूकता, तसेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना , प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना , अटल पेंशन योजना या सामाजिक सुरक्षा योजनांची माहिती दिली जाणार आहे.



ठाणे जिल्ह्याची अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील आसनगाव येथे दि.१३ ऑगस्ट २०२५ रोजी वित्तीय समावेशन (FI) शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला असून एकूण १५० पेक्षा जास्त ग्राहकांनी शिबिरात हजेरी लावली.

या शिबिरासाठी श्री. संदीप कुमार, मुख्य महाव्यवस्थापक, (CGM, Reserve Bank of India, Mumbai), श्री. राजकिशोर रंजीत, उपमहाव्यवस्थापक व विभागीय व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, ठाणे विभाग, श्री. राजेंद्र कनिशेट्टी, लीड डिस्ट्रिक्ट ऑफिसर, Reserve Bank of India , श्री. अभिषेक पवार, लीड डिस्ट्रिक्ट मॅनेजर (LDM), ठाणे जिल्हा, बँक ऑफ महाराष्ट्र, FI विभाग, विभागीय कार्यालय, ठाणे व शाखा व्यवस्थापक, आसनगाव ग्रामपंचायतचे सरपंच व उपसरपंच, ग्राम विस्तार अधिकारी आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उद्देशाचे विवेचन जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक (लीड डिस्ट्रिक्ट मॅनेजर, LDM) श्री. अभिषेक पवार यांनी केले. त्यांनी सांगितले की, भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभाग व भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) यांच्या निर्देशानुसार, ठाणे जिल्ह्यात ४२६ ग्रामपंचायतींमध्ये १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत विशेष आर्थिक साक्षरता मोहीम राबविण्यात येत आहे.

श्री.आशीष लोहकरे, संचालक RSETI ठाणे यांनी वित्तीय साक्षरता व सामाजिक सुरक्षा योजनांचे (PMJJBY, PMSBY, APY) सविस्तर सादरीकरण केले. श्री. राजकिशोर रंजीत, विभागीय व्यवस्थापक व उपमहाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र यांनी डिजिटल आर्थिक साक्षरता व नामनिर्देशनाचे महत्त्व अधोरेखित केले.

श्री. संदीप कुमार, मुख्य महाव्यवस्थापक, (CGM, Reserve Bank of India, Mumbai). यांनी री-केवायसीचे महत्त्व, या मोहिमेचा उद्देश व ग्राहकांपर्यंत बँक सेवा 'घरपोच' पोहोचत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी विशेष करून महिलांना संदेश दिला की, "आपले बँक खात्याची काळजी कशी घ्यायची. जितक्या जपून घरात आपण आपला कुंकवाचा करंडा जपतो, तितकेच बँक खाते सुरक्षित ठेवा." तसेच, वेळेत री-केवायसी पूर्ण करून खाते चालू ठेवण्याचे आवाहन केले. हा संदेश सर्व उपस्थितांनी आपले नातेवाइक, मित्र यांच्यापर्यंत पोहोचवा.

शिबिरात ग्राहकांना विविध सामाजिक सुरक्षा योजना, री-केवायसीचे महत्त्व, डिजिटल फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक काळजी तसेच नामनिर्देशनाची आवश्यकता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या ठिकाणी मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे करण्यात आले होते. तसेच RSETI मधे प्रशिक्षण घेऊन व्यवसाय करनारे महिलानी त्यांच्या उत्पादन चे प्रदर्शन आयोजीत केले होते. हे शिबिर अत्यंत यशस्वी ठरले असून वित्तीय समावेशन व सामाजिक सुरक्षा यांचा संदेश मोठ्या प्रमाणावर ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यात यश आले.



# आमदार किसन कथोरे यांच्याकडून रिक्षा चालकाच्या प्रामाणिकपणाची दखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रायते बिर्ला गेट रिक्षा स्टॅन्डचे सदस्य रिक्षा चालक श्रीकांत तारमले यांना गेल्या आठवड्यात रिक्षा मध्ये मिळालेली पर्स पोलिसांच्या मदतीने महिलेचा शोध घेऊन त्यामध्ये असलेली रक्कम व मौल्यवान वस्तू परत केल्याने त्याचा सर्वत्र, सत्कार होत असुन या कार्याची दखल घेत मुरबाड विधानसभेचे कार्यसम्राट आमदार श्री. किसनजी कथोरे साहेब यांनी रिक्षा चालक,श्रीकांत तारमले यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या यावेळी त्यांच्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष राम सुरोशी उपस्थित होते,तसेच ग्रामस्थ मंडळ रायते, ओम साई इंग्लिश स्कूल, रायते विभाग हायस्कूल रायते,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ठाणे जिल्हा ग्रामीण व कल्याण तालुक्याच्या वतीनेत्यांचा सत्कार करण्यात आला,यावेळी श्रीकांत तारमले यांनी सर्वांचे आभार मानले

## साईबाबा, दर्शना इंटरप्रायजेस आणि पत्रकार संघटनेच्या वतीने

# फांगुळगव्हाण शाळेतील विद्यार्थ्यांना मिळाले गणवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण (प्रतिनिधी)**

कल्याण मधील कांबा येथील साईबाबा,दर्शना इंटरप्रायजेस चे मोहन शेठ,अनिल शेठ शेलार यांच्या पुढाकाराने आणि जनाधार निर्भीड पत्रकार संघटनेचे अध्यक्ष संजय कांबळे यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे जिल्हयातील शेवटची ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या फांगुळगव्हाण जिल्हा परिषद शाळेतील आणि निरगुडपाडा शाळेतील मुलांना स्वातंत्र्यदिनाच्या पुर्वसंध्येला गणवेशाचे वाटप पत्रकार संजय कांबळे यांच्या हस्ते व ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, सामाजिक कार्यकर्ते यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



काही महिन्यांपूर्वी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष संजय कांबळे यांनी माळशेज घाटात वसलेल्या आणि जिल्ह्यात शेवटची ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या फांगुळगव्हाण ग्रामपंचायतीला भेट दिली होती.यावेळी त्यांनी फांगुळगव्हाण, निरगुडपाडा, येथील आदीवासी मुलांना गणवेश देण्यात येईल असे आश्वासन येथील सामाजिक कार्यकर्ते सुदाम भला, संतोष पारधी, पत्रकार किरन कारभळ, यांना दिले होते, त्याची वचनपूर्ती करण्यासाठी ते आज फांगुळगव्हाण येथे जाऊन जिल्हा परिषद शाळेतील ८० मुलांना तसेच निरगुडपाडा शाळेतील १८ विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले, आपण आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, पाणी उकळून प्यावे, विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, गावात स्वच्छता ठेवावी, आपल्या देशातील आदर्श व्यक्तींना डोळयासमोर ठेवून अभ्यास करावा व आपले नाव रोशन करावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी फांगुळगव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच राजू भला, सदस्या मनिषा भला, तानाजी भला, समाजसेवक रवींद्र भला, मैदू भला, अंगणवाडी सेविका शालू भला, लालिबाई वाख, पुजा प्रभू दरवडा,साखरवाडी शाळेच्या कोटकर मॅडम राठोड सर, निरगुडपाडा शाळेच्या रेखा डुंबरे मॅडम, उलवळे सर, ग्रामस्थ बाळू लचका, मयूर भला, फांगुळगव्हाण जि प शाळेचे गवांदे सर, पाटील मॅडम, व पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यात टॅबचे वितरण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते या सर्व मोबाईल मेडिकल युनिट टीमना टॅबलेट्स वाटप करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या समिती सभागृह, जिल्हा परिषद ठाणे येथे हा कार्यक्रम पार पडला.

या टॅबलेट्समध्ये विशेष सॉफ्टवेअर उपलब्ध करण्यात येणार असून यामुळे रोजच्या आरोग्यसेवा अहवालाची नोंद (Daily Reporting) ऑनलाईन पद्धतीने केली जाईल. यामुळे मोबाईल मेडिकल युनिटचे कार्य अधिक मॉडर्न, अद्ययावत व कार्यक्षम होणार आहे.

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-Janman) आणि प्रधानमंत्री पीव्हीटीजी विकास मिशनअंतर्गत ठाणे जिल्ह्यात कार्यरत असलेल्या १० मोबाईल मेडिकल युनिट्स ग्रामीण व आदिवासी भागातील कातकरी समाज तसेच दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्य सेवा पुरवत आहेत. या युनिट्समध्ये चार जणांची वैद्यकीय टीम असते. वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्निशियन, फार्मासिस्ट आणि सहाय्यक यामार्फत दुर्गम भागातील नागरिकांना मोफत तपासणी, औषधोपचार आणि आरोग्यविषयक सल्ला दिला जातो.

# केडीएमसी निवडणुकीत ठाकरे ब्रँडचाच महापौर - कौस्तुभ देसाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना व स्वराज्य प्रतिष्ठान यांच्या वतीने कल्याण पश्चिमेतील बेतूरकर पाडा येथे भव्य दहीहंडी उत्सव 2025 आयोजित करण्यात आला होता. जेष्ठ समाजसेवक किशोर देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली मनसेचे माजी शहर अध्यक्ष कौस्तुभ देसाई, माजी नगरसेविका तथा मनसेच्या महिला शहर अध्यक्षा कस्तुरी देसाई, स्वराज्य प्रतिष्ठाण अध्यक्ष कल्पेश देसाई यांनी या भव्य उत्सवाचे आयोजन केले. कल्याण,डोंबिवली, ठाणे जिल्ह्यासह मुंबईतील अनेक गोविंदा पथकांनी याठिकाणी हजेरी लावत सलामी दिली. प्रत्येक गोविंदा पथकांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याठिकाणी विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम



प्रसाद खांडेकर, रोहित माने, नम्रता संभेराव यांसह इतर सिने कलाकारांनी आणि ऑर्केस्ट्रा कलाकारांनी उपस्थीत राहून कल्याणकरांचे मनोरंजन केले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या या दहीहंडीला यंदा 14 वर्षे पूर्ण होत असून, दरवर्षी शेकडो गोविंदा पथके हजेरी लावत असतात. महाराष्ट्र हा सांस्कृतिक राज्य असून विविध सण उत्सव साजरे होत असतात. दहीहंडी उत्सवाला मराठी माणूस मोठ्या प्रमाणात एकत्र येत असतो. असेच मराठी माणसांनी एकमेकांसाठी एकत्र येऊन सोबत रहावे जेणेकरून मराठी माणसाचे खच्चीकरण होणार नाही असे मत यावेळी मनसेचे माजी शहर अध्यक्ष कौस्तुभ देसाई यांनी व्यक्त केली.

तर याठिकाणी लावलेला ठाकरे ब्रँडचा बॅनर सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. यामध्ये प्रबोधनकार ठाकरे, बाळासाहेब ठाकरे, राज ठाकरे, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, अमित ठाकरे, रश्मी ठाकरे, शर्मिला ठाकरे यांचे फोटो आणि एक वज्रमुठ दाखवण्यात आली आहे. ही वज्रमुठ म्हणजे ठाकरेंची ताकद असून ही ताकद कोणीही तोडू शकत नाही. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्यास महाराष्ट्रात ठाकरेंचीच सत्ता असेल आणि आगामी कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत ठाकरे ब्रँडचाच महापौर बसेल असा विश्वास देखील कौस्तुभ देसाई यांनी व्यक्त केला.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024